# वैद्यकीय अधिकारी गट-अ ( एस-२०) मधील पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी अर्जातील त्रुटींचे अनुषंगाने सूचना/उमेदवारांनी त्रुटींची पुर्तता करण्यासाठी महत्वपुर्ण सूचना

**वैद्यकीय अधिकारी गट-अ ( एस-२०)** पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची पात्र ( Eligible) व अपात्र (Not Eligible) अशी स्वतंत्र यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या यादीमधील उमेदवारांचे नावासमोर Remarks या रकान्यामध्ये नमुद केलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी उमेदवारांना खालीप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. -

अ) पात्र यादीतील उमेदवारांसाठी सूचना —

१. पात्र यादीतील ज्या उमेदवारांचे नावासमोर Remarks या रकान्यामध्ये कोणतेही Remarks नमुद केलेले नसतील/किंवा Applicant Eligible असे Remarks नमुद अशा उमेदवारांचा अर्ज परिपुर्ण असून त्यांनी कोणतीही माहिती भरावयाची आवश्यकता नाही.

२. ज्या उमेदवारांनी एमबीबीएस मधील संबंधित/सर्व वर्षांच्या गुणपत्रिका/NMC/MMC certificate/मुळ कागदपत्रांची प्रत/मुळ प्रमाणपत्राची प्रत (certificate)/लहान कुटुंब प्रमाणपत्र/self declaration upload केलेले नाहीत अशा उमेदवारांनी Remarks या रकान्यामध्ये नमुद केल्यानुसार कादपत्रांची/प्रमाणपत्राची मुळ प्रत upload करणे अनिवार्य आहे. अन्यथा उमेदवारांना अंतिमतः अपात्र ठरवले जाईल.

३. ज्या उमेदवारांचे अनुभव प्रमाणपत्र विहीत नमुन्यात नसेल अथवा प्रमाणपत्रावर संबंधित संस्थेचा शिक्का/संस्था प्रमुखाची स्वाक्षरी नसेल तर असे अनुभव प्रमाणपत्र तर Remarks या रकान्यामध्ये नमुद अभिप्रायानुसार प्रमाणपत्र (certificate) upload करणे अनिवार्य आहे अन्यथा त्यांना अनुभवाचे गुण दिले जाणार नाहीत.

४. अर्जदार हया महिला असतील व त्यांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यायचा असल्यास त्यांनी त्यांचे आरक्षण अर्जात महिला आरक्षाचा लाभ यामध्ये **"होय"** हा पर्याय निवडावा अन्यथा त्यांना महिला आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

५. अर्जदारांना त्यांच्या MBBS च्या अथवा अनुभवाच्या गुणांबाबत हरकती नोंदविता येतील.

ब ) अपात्र यादीतील उमेदवारांसाठी सूचना —

१. अपात्र यादीमध्ये ज्या उमेदवारांचे Remarks या रकान्यामध्ये केवळ Applicant Eligible असा शेरा नमुद असेल अशा उमेदवारांनी कोणतेही कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही अशा उमेदारांचा अर्ज अंतिम यादीमध्ये पात्र (Eligible) उमदेवारांचे यादीमध्ये समाविष्ठ केले जातील.

२. ज्या उमेदवारांचे बाबत Remarks या रकान्यामध्ये नमुद केल्यानुसार कागदपत्रांची प्रत /प्रमाणपत्राची प्रत (certificate) upload करणे अनिवार्य आहे. अन्यथा अशा उमदेवारांना अंतिम यादीमध्ये अपात्र ठरवले जाईल व त्यांच्या नावाचा पदभतीमधील पुढील प्रक्रियेत कुठेही समावेश केला जाणार नाही.

३. ज्या उमेदवारांनी खेळाडू या आरक्षण प्रवर्गातून अर्ज केला आहे. तथापि त्यांचेकडील प्रमाणपत्र हे जाहिरातील नमुद अ.क्र.३.१४ नुसार नसलेल्या अर्जदारांना अपात्र केले आहे. असे उमेदवारांनी त्यांचे जातीचे मुळ प्रवर्गातून अथवा खुल्या प्रवर्गातून अर्ज करण्यास संमती दर्शविल्यास त्यांचा अर्ज पात्र ठरविला जाईल. त्यांनी संमती दर्शविली नाही त्या उमेदवारांचे अर्ज अंतिमतः अपात्र( Not eligible ) दर्शविले जातील.

४. ज्या उमेदवारांच्या नावासमोरील रकान्यामध्ये आक्षेप नोंदविले आहेत. त्या उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर नमुद आक्षेपांची विहित कालावधीत पूर्तता करावी. तसे न केल्यास त्यांना अपात्र समजण्यात येईल.

अर्जदारांनी त्रुटींची पुर्तता करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया करावी-

उमेदवारांनी " https://www.morecruitment.maha-arogya.com" या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करतेळी नमुद केलेला भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक नमुद करुन Login करुन OTP टाकल्यानंतर अर्जदाराचा डॅशबोर्ड open होईल. डॅशबोर्ड च्या सर्वात खालील बाजूस Objection Process या लिंकवरती (link) क्लीक करुन उमेदवारांनी संकेतस्थळावर प्रसिध्द यादीत नमुद केलेल्या Remarks या रकान्यानुसार objection/कागदपत्रे upload करावीत".

ठिकाण — मुंबई

दिनांक- २४/४/२०२६ दु. १.३०

-------